स्थायी समितीच्या **मंगळवार** दिनांक 21–06–2011 रोजी दुपारी 12–30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## <u>उपस्थित सभासद</u>

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. संदिप दिवाकर जोशी | **अध्यक्ष** |
| 2. | श्री. विकास उर्फ बाबा माधवराव मैंद | सदस्य |
| 3. | श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |
| 4. | सौ. उषा गोपाल बोहरे | सदस्या |
| 5. | श्री. भारतभूषण ऋषीपंत गायधणे | सदस्य |
| 6. | सौ. मंदाताई उर्फ आक्का गंगाधर लेंडे | सदस्या |
| 7. | श्री. बंडू उर्फ सुधिर हरिदास राऊत | सदस्य |
| 8. | श्री. प्रविण आत्माराम सांदेकर | सदस्य |
| 9. | श्री. अरविंदरपाल सिंग उर्फ बब्बी बावा | सदस्य |
| 10. | श्री. अरुण वसंतराव डवरे | सदस्य |
| 11. | श्री. झुल्फेकार अहमद शेख अहमद भूट्टो | सदस्य |
| 12. | सौ. सिंधु रामाजी उईके | सदस्या |
| 13. | सौ. कल्पना सुरेश डवरे | सदस्या |
| 14. | श्री. मोहम्मद कामील अंसारी मो. हसन | सदस्य |
| 15. | डॉ. मिलींद माने | सदस्य |
| 16. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |

## <u>उपस्थित अधिकारी</u>

1) श्री. विष्णुपद बुटे, अपर आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 19</u> :— वॉर्ड क्र. 131, महालक्ष्मी नगर भागातील सांडपाणी म.न.पा. भूमिगत नालीद्वारे सिमेच्या बाहय भागातील इंद्रनगर भागातून नाल्याला वहन करण्याकरीता चे कामास्तव प्राप्त निम्नतम निविदाकार मे. नंदकिशोर एन.थोटे, यांची प्राकलनीय दरापेक्षा 17.87 टक्के कमी दराची रु. 20,45,037/— राशीच्या निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 20</u> :— महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लॉन्ट एम.आय.डि.सी. हिंगणा करिता बंद डब्यातील व खुले डांबर एच.पि.सि.ल./आय.ओ.सि.एल./एच.पि.सि.एल. मूंबई कडून डांबर वाहतूक करण्याच्या कामाकरिता एकुण तिन निविदा प्राप्त झाल्या त्यापैकी मे. नारायनदास अग्रवाल यांनी सादर केलेली निम्नतम निविदा प्राकलनीय राशी पेक्षा 25.2 टक्केनी कमी दराची रु. 18,61,024/— राशीची निम्नतम निविदा स्विकृत करुन निविदेस मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 21</u> :— महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लॉन्ट विभागातर्फे नागपूर शहरातील रस्त्याची दुरुस्ती व सुस्थिती करण्याकरिता लेबर पुरवठा करण्याकरीता मागविण्यात आलेल्या प्राप्त निविदा पैकी निम्नतम दराची मे. श्रीराम कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 18.15 टक्के कमी असलेली रु. 20,38,883.50 राशीचे निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 22</u> :— सेमीनरी हिल्स येथील इंन्कम टॅक्स ऑफीसर्स कॉलोनी करिता 150 मि.मि. व्यासाची जलवाहिनी टाकण्याचे कामाकरीता रुपये रु. 11,04,394/— च्या प्राकलनीय खर्चास मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 23</u> :— म.न.पा.च्या माध्य. शाळातील इयत्ता 9 ते 12 वी च्या विद्यार्थ्यांना सत्र 2011—12 करिता म.न.पा. मार्फत मोफत पाठयपुस्तके पुरविण्याकरिता पाठयपुस्तक मंडळाकडून खरेदी करण्यास्तव रु. 17,86,000/— व या पुस्तकांच्या वाहतूकी करिता व नियोजीत स्थळी पोचविण्याकरिता रु. 40,000/— असा एकूण रु. 18,26,000/— खर्च करण्याकरिता मंजूरी प्रदान करुन "पाठयपुस्तक मंडळ" या नावे रु. 17,86,000/— (रु. सतरा लक्ष शहाऐंशी हजार फक्त) अग्रीम धनाकर्ष (डी.डी.) आणि शि.अ. (माध्यमिक) यांचे नावे रु. 40,000/— (रु. चाळीस हजार फक्त) अग्रीम उचल करण्याकरीता मंजूरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

हा खर्च पद क्र. 428 मधून देय असेल.

**<u>ठराव क्रमांक 24</u>** :– टॅकरद्वारे पाणीपुरवठा कामाअंतर्गत सर्व Hydrant वर संगणकद्वारे स्लीप वितरण, व ही व्यवस्था सद्या G.P.R.S. प्रणालीशी जोडून टॅकरद्वारे पाणी पुरवठयाच्या कामावर नियंत्रण ठेवणे तसेच याकरिता Software तयार करुन ही संगणक प्रणाली आवश्यक मनुष्यबळासह चालविण्याकरिता ई–निविदा मागविण्यात आल्या असता मे. विदर्भ इंफोटेक प्रा. लि. यांची 15 टक्के कमी दराची रु. 16,58,755/– किमतीची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 25</u>** :– वार्ड क्र. 80 सिताबर्डी येथील सोनी लेन आणि वामन लेन पर्यंत सिमेंट रोडचे काम करण्याच्या कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदेमध्ये मे. जाहीद गुलरेज कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 7.86 टक्के कमी दराची रु. 13,82,045/– ची निम्नतम निविदा प्राप्त आहे. या निविदेस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 26</u>** :– म.न.पा. अंदाजपत्रक वर्ष 2011–12 अन्वये मंगळवारी क्षेत्रिय कार्यालयास महसुली व भांडवली खर्चास्तव प्राप्त एकुण तरतुद रु. 785.69 लक्ष च्या अधिन राहुन पदनिहाय व वार्ड निहाय पुनःर्नियोजन करुन यास प्रभाग समिती ठराव क्र. 03 दिनांक 04.06.2011 अन्वये मंजुरी प्राप्त केलेली आहे.

क्षेत्रिय कार्यालयाच्या वर उल्लेखित रु. 785.69 लक्ष राशीच्या अंदाजपत्रकास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 27</u>** :– म.न.पा. अंदाजपत्रक वर्ष 2011–12 अंतर्गत गांधीबाग झोन क्र. 6 करिता करण्यांत आलेल्या महसुली व भांडवली खर्चाच्या पदा अंतर्गत उपलब्ध तरतुदीचे प्रावधानाचे पद निहाय आवंटनास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 28</u>** :– नागपूर शहरातील पथदिव्यांच्या दुरुस्तीकरीता लॅम्पस्, चोकस् व इग्नेटर्स इत्यादी साहित्य खरेदी करण्याच्या कामाकरीता ई–निविदा बोलाविल्या असता प्राप्त निविदांपैकी मे. बजाज इलेक्ट्रीकल्स लि., मे. क्रॉम्टन ग्रीव्हज लि.मे. सुर्या रोशनी लि., मे. ओसराम (इंडिया) प्रा.लि., मे. फिलीप्स इंडिया लि. व मे. विप्रो लि. यांचे प्राकलनीय दरांच्या तुलनेत 0.0 टक्के ते 20.59 टक्के ने कमी दर असलेले सुधारीत निविदा दर मंजूर करुन शक्यतो समप्रमाणात आवश्यकतेनुसार रु. 85,00,000/– पर्यंत खर्च सिमीत ठेऊन या साहित्याचा पुरवठा करवून घेण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 29</u> :— नागपूर महानगरपालिकेतील आरोग्य विभागाच्या विविध झोन परिसरामधील सार्वजनिक ठिकाणी ठेवलेल्या कचरा पेटया , घाणीचे ढिग, मलमुत्र विसर्जनाच्या जागा , भाजी मंडया , सर्व कत्तलखाने, भांडेवाडी डम्पींग तसेच दिक्षाभुमी सोहळया प्रसंगी, ताजबाग उर्सच्या प्रसंगी व सार्वजनिक होणाऱ्या कार्यक्रमाच्या प्रसंगी मोठया प्रमाणात कार्बोलिक पावडर चा वापर करण्यात येते. विभागाने मा. स्थायी समिती ठराव क्र. 295 दि. 16.10.2010 अन्वये एक वर्षाच्या कालावधीसाठी निविदा मागविण्यात आल्या त्यामध्ये एकूण चार निविदा प्राप्त झाल्या निम्नतम दर मे. रमेश ॲग्रो केमिकल कार्पोरेशन, कल्याण यांचे प्राप्त झाले असून कार्बोलिक ( 50 kg ) प्रती बॅग रु. 1543/— प्रमाणे एकूण 1500 बॅग खरेदीवर एकूण रु. 23,14,500/— खर्च अपेक्षीत असून हा खर्च आय व्यय पद क्र. 348 मधून किंवा इतर उपलब्ध प्रावधानामधून भागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 30</u> :— हनुमाननगर झोन क्र. 3, क्षेत्रीय कार्यालय नागपूर महानगरपालिका सन 2011—2012 चे अंदाजपत्रकात एकुण तरतुद 730.66 लक्ष केलेली आहे. प्रभाग समिती ठराव क्र. 3 दिनांक 24.5.2011 अन्वये मा. सभापती प्रभाग समिती यांना दिलेल्या अधिकारानुसार त्यांनी सोबत जोडलेल्या परिशिष्ट '' अ'' प्रमाणे सादर केलेल्या अंदाजपत्रकास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 31</u> :— वार्ड क्र. 47 मधील रामनगर येथील प्रभात रेस्ट्रारेंट ते तेलंगखेडी रोडपर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निम्नतम निविदाकार मे. प्रेमचंद राचूमल यांची प्राकलणीय दरापेक्षा 26. 66 टक्के कमी दराची रु. 13,16,851/— राशीची निविदा मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 32</u> :— नागपूर महानगरपालिका अंदाजपत्रक सन 2011—12 नुसार लकडगंज झोन क्र. 8, हया क्षेत्रीय कार्यालयाकरिता करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदी नुसार जुने देणे रु. 240.82 लक्ष, सन 2011 — 12 करीता प्रस्तावित कामाकरिता रु. 653.34 लक्ष एकूण रु. 894.36 लक्षचे पदनिहाय आवंटनास सोबत संलग्न परिशिष्ट ''अ'' प्रमाणे मंजुरी प्रदान करण्यास तसेच सन 2011— 12 चे लकडगंज झोन क्र. 8 चे मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीमधील विविध झोनल पदा अंतर्गत आवंटीत राशीचे पुर्नःनियोजन करण्यास प्रभाग समिती लकडगंज झोन क्र.8 चे ठराव क्र. 3 दि. 30.5.2011 नुसार मंजुरी प्राप्त असून सदर ठरावास म.न.पा. ठराव क्र. 218 दि. 5.5.2011 नुसार स्थायी समितीला प्राप्त अधिकारानुसार मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 33</u> :– प्रभाग समिती आसीनगर यांनी आर्थिक वर्ष 2011–2012 चे मंजूर केलेले अर्थसंकल्प सहपत्र ''अ'' प्रमाणे मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन पद क्र.

| | | |
|---|---|---|
| 291 | – | रु. 1.50 |
| 293 | – | रु. 0.50 |
| 330 | – | रु. 0.50 |
| 334 | – | रु. 0.50 |
| 367 | – | रु. 0.50 |
| 459 | – | रु. 2.00 |
| 613 | – | रु. 2.00 |
| **एकुण** | | **रु. 7.50** |

हा प्रभाग क्र. 3 चा निधि पद क्र. 676 एकुण रु. 263.33 (रस्त्यांची सुधारण निर्माण) या पदात वळता करण्यांत येतो तसेच हा निधी उपरोक्त कामा करीता प्रभाग क्र. 3 मध्ये खर्च करण्याच्या सुचनेसह विषयास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 34</u> :– नागपूर महानगरपालिका सन 2011–12 चे अंदाजपत्रकानुसार विविध झोनल पदा अंतर्गत कामाकरीता अर्थसंकल्पीय तरतुदी जुने देणे रु. 95.84 लक्ष, सन 2011 – 12 करीता रु. 656.38 लक्ष व एकूण रु. 752.22 लक्ष या राशीचे विविध झोनल पदाअंतर्गत मा. सदस्यांच्या सुचनेनुसार आवंटन करण्यात आले असून झोन करिता एकूण प्राप्त रक्कमेत कोणतीच वाढ करण्यात आलेली नाही. करिता सन 2011– 12 चे धंतोली झोन क्र. 4 चे झोनल पदाअंतर्गत पुनःर्विनियोजन प्रस्तावास प्रभाग समिती ठराव क्र. 3 दि. 30.5.2011 रोजी मंजुरी प्रदान करण्यात आली असुन या प्रस्तावाला मा. स्थायी समितीचे मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 35</u> :– तुळशीबाग गाडगे टाका, महाल वार्ड क्र. 70 येथे 100,150 व 200 मि.मि.व्यासाच्या वितरण जलवाहिन्या टाकण्याकरिता ई निविदा (चौथी वेळ ) बोलविण्यात आली असता , मे. ए.आर.सिंग कन्स्ट्रक्शन कंपनी , नागपूर यांची 0.61 टक्केने कमी दराची व रु.10,80,959.68 किमतीची एकमेव निविदा स्वीकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 36</u> :– नागपूर शहरातून वाहणाऱ्या नदंया मधील प्रदुषण कमी Dewats अंतर्गत 5 एमएलडी चे 3 व 3 एमएलडी चे 1 असे

एकूण 4 मलशुध्दीकरण केन्द्र बांधण्याकरिता रु. 25.23 कोटीचे ढोबळ प्राकलनास प्रशासकीय मंजूरी देण्याबाबत.

उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने विभागाने एक छोटा उपक्रम म्हणून महानगरपालिकेमार्फत शहरातील नदयांमध्ये प्रदुषण कमी करण्याकरिता Dewats अंतर्गत प्रत्येकी 5 एमएलडी चे 3 व 3 एमएलडी चे 1 असे एकूण 4 मलशुध्दीकरण केन्द्र नदयांवर (नाग व पिवळी नदी ) बांधण्याचे प्रस्तावित असून याचे ढोबळ प्राकलन तयार करण्यात आले आहे. यामुळे नद्यांमधील प्रदुषण काही प्रमाणात कमी करण्यास मदत होईल, प्रस्तावित ढोबळ प्राकलनाची अंदाजी किंमत रु.25.23 कोटी आहे. या कामाला प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 37</u> :– नागपूर महानगरपालिका सन 2011–2012 चे अंदाजपत्रानुसार विविध झोनल पदांतर्गत कामाकरीता पुर्नविनियोजन करुन अर्थसंकल्पीय तरतुदीचे आंवटन परिशिष्ट 'अ' व परिशिष्ट 'ब' नुसार प्रभाग समिती ठराव क्र. 3 दिनांक 26.05.2011 द्वारे मंजूर करण्यांत आले आहे.

करिता प्रस्तावित ठराव स्थायी समितीच्या मंजूरीस्तव प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 38</u> :– सतरंजीपुरा झोन क्र. 7 – नागपूर म.न.पा. च्या 2011–2012 च्या मंजुर अंदाजपत्रकानुसार सतरंजीपुरा झोन क्र. 7 या क्षेत्रीय कार्यालयास विविध पदाअंतर्गत क्षेत्रीय अर्थसंकल्प करण्यास्तव तरतुद, रु. एकुण 652.18 लक्ष प्राप्त झालेली आहे. परिशिष्ट अ, ब व क प्रमाणे प्रभाग समिती ठराव क्र. 3 दि. 30.05.2011 अन्वये मंजुर करण्यांत आलेला आहे. यानुसार सोबत जोडलेल्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 39</u> :– नागपूर म.न.पा. च्या 2011–2012 चे अंदाजपत्रकानुसार विविध झोनल पदाअंतर्गत कामाकरिता पुनर्विनियोजन करुन अर्थसंकल्पीय तरतूदीचे आंवटन परिशिष्ट 'अ' व 'ब' नुसार प्रभाग समिती ठराव क्र. 3 दिनांक 31.05.2011 द्वारे मंजूर करण्यांत आले आहे.

करिता प्रस्तावित ठराव स्थायी समितीच्या मंजूरीस्तव प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 40</u> :– धरमपेठ झोन क्र. 2 प्रभाग समितीचे दिनांक 03.06.2011 व 08.06.2011 चे बैठकीत ठराव क्र. 9 अन्वये पदनिहाय व वॉर्डनिहाय अंदाजपत्रकास मंजुरी प्रदान करण्यात आली असून त्याप्रमाणे पुढील

मंजुरीस्तव स्थायी समितीकडे पाठविण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. त्यानुसार सोबतच काही पदअंतर्गत प्रावधान वळते करण्याबाबतचा तक्ता खालील प्रमाणे आहे.

रुपये लाखात

| अ. क्र. | ज्या पदातून वळते करावयाचे आहे ते पद क्र. | स्थायी समितीद्वारे प्रस्तावित तरतुद | | | ज्या पदात तरतुद वळती करावयाचे आहे. | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जुने देणे | प्रस्तावित | एकुण | पद क्र. | स्थायी समितीद्वारा प्रस्तावित | वळती करावयाची राशी | पुनर्विनियोजन एकुण प्रस्तावित राशी |
| 1 | 367 | 1.40 | 6.14 | 7.54 | 613 | 15.00 | 5.00 | 20.00 |
| 2 | 668 | 0.00 | 5.00 | 5.00 | 613 | 00 | 4.00 | 4.00 |
| 3 | 620 | 7.70 | 10.00 | 17.70 | 613 | 00 | 1.00 | 1.00 |
| 4 | 637 | 0.00 | 2.00 | 2.00 | 613 | 00 | 1.50 | 1.50 |
| | | 9.10 | 23.14 | 32.24 | | | 11.50 | 26.50 |
| 5 | 617 | 00 | 1.00 | 1.00 | 251 | 1.00 | 1.00 | 2.00 |

अंदाजपत्रकास वरीलप्रमाणे प्रावधान वळते करण्याचे प्रस्तावासह मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

श्री राहुल तेलंग :– मा.अध्यक्ष महोदय, महानगरपालिकेच्या इतिहासात पहिल्यांदा आपल्या माध्यमातुन एप्रिल महिन्यामध्ये अर्थसंकल्प मंजूर झाला, या अगोदर जुन जूलै महिन्यामध्ये अर्थसंकल्प मंजूर होत होता. तीन महिन्याच्या आंत आपण एप्रिल महिन्यात

अर्थसंकल्प तयार केला कारण कि हा शेवटचा वर्ष आहे. चार पांच महिन्यात नागपूर शहराच्या सर्व वार्डात विकासाचे काम व्हावयास पाहिजे अशी आपली इच्छा होती. मा. सदस्यांनी लवकरात लवकर काम व्हावे या हेतुनी आपल्या वार्डाच्या नस्त्या तयार केल्या आहे, याकरिता आपल्या माध्यमातुन मा.सदस्यांना पत्र मिळाले, पत्र मिळाल्यानंतर हया नस्त्या जेव्हा आयुक्तांकडे जाते तेव्हा 15 दिवस सही होत नाही, याचे काय कारण आहे, कृपया याचे स्पष्टीकरण देण्यांत यावे. गायकवाड साहेब आपल्या माध्यमातुन किती नस्त्या आयुक्तांकडे गेल्या आहेत. माझया वार्डाची तीन चार नसती आयुक्तांकडे गेलेली आहे. त्यांनी परत तुमच्याकडे पाठविलेल्या आहेत. 15 दिवस झाले ती फाईल त्यांनी परत पाठविली आहे याचे काय कारण आहे.

कॅफो :— मा.अध्यक्ष महोदय, माझयाकडे कोणती ही नसती पेंडींग नाही.

नगरयंत्री :— मा.अध्यक्ष महोदय, दोन नसती साहेबांनी परत केली त्यांनी म्हटले कि मिटींग घेतल्यानंतर कामाची कार्यपध्दती निश्चित करण्यांत येईल.

अध्यक्ष :— चार पांच महिन्यानंतर मा.सदस्यांना निवडणुकीला सामोरे जायचे आहे, तुमच्या मताप्रमाणे कार्यपध्दती चालेल काय ? 5 मे ला बजेटवर चर्चा होवून बजेट मंजूर करण्यांत आले, त्यानंतर त्या बजेटची अंमलबजावणी करण्यांत आली, माझी प्रशासनाला सूचना आहे कि त्यांनी हा विषय गंभीरतेने घ्यावा, टालमटोलीचे उत्तर कृपया देवु नये.

श्री राहुल तेलंग :— मा.अध्यक्ष महोदय, सन 2010—11 मध्ये ज्या कामाचे कार्यादेश देण्यांत आले होते, ते काम अजूनपर्यंत सुरू झाले नाही, हेड क्रमांक 681, 682 ची माझया वार्डाची 4 फाईल आहे, त्या हेडमधुन काही कामाची सुरूवात झाली नाही.

नगरयंत्री :— मा.अध्यक्ष महोदय, ठेकेदारांना पावसाळया अगोदर काम सुरू करण्याबाबत पत्र दिले आहे.

अध्यक्ष :— श्री कराडे मिटींगमध्ये उपस्थित राहणार नाही, अशी सूचना प्राप्त झाली आहे काय ? श्री प्रधान यांचे कुठे बयाण सुरू असल्यामुळे ते मिटींगमध्ये उपस्थित राहु शकत नाही, अशी सूचना मिळाली आहे त्याचबरोबर श्री जांभुळकर काही कामानिमित्यांनी मिटींगमध्ये येवु शकत नाही, जे अधिकारी सूचना न देता मिटींगमध्ये येत नाही त्यांच्या संदर्भात ही स्थायी समिती नाराजगी प्रदर्शित करते, या बाबीला अधिका—यांनी गंभीरतेने घ्यावा, 12 वाजता दिलेल्या वेळी स्थायी समितीची बैठक सुरू होते. जे अधिकारी येथे उपस्थित नाही त्यांना कारणे दाखवा नोटीस पाठविण्यांत यावे.

श्री भुटटो :— मा.अध्यक्ष महोदय, ओल्ड भंडारा रोड पर डांबरीकरण का काम किया गया, वहां एक जगह ज्यादा पानी जमा होराह है जिसकी वजह से आजू बाजू के दुकानदारो को काफी तकलीफ होरही है, और उसी तरह से श्री बागडी के घर के पास मे लोगो को गाडी पार्क करने के लिये जगह नही है, बार बार बोलने के बाद भी छोटासा काम नही होरहा है, इस ओर ध्यान दिया जाये। नागपूर शहर मे घाट और कब्रस्तान का दौरा किया गया था, उस संदर्भ मे क्या कारवाई हुई है, वह यहां बताया जाये।

अध्यक्ष :— नागपूर शहरात समशान घाट व कब्रस्तानाच्या कामाबाबत झोनवाईट माहिती देण्यांत यावी.

सहा.आयुक्त :— मा.अध्यक्ष महोदय, झोन एकमध्ये दोन फाईल तयार आहे. झोन 3 मध्ये घाटाचा प्रस्ताव तयार आहे. झोन 4 मोक्षधाम 5 लक्ष रूपयांचा प्रस्ताव तयार आहे. झोन 6 मध्ये कब्रस्तानचा प्रस्ताव तयार आहे, झोन 7 च्या घाटाचा प्रस्ताव तयार केला आहे. झोन 9 मध्ये वैशालीनगर घाटाचा प्रस्ताव तयार केला आहे.

श्री राहुल तेलंग :— मा.अध्यक्ष महोदय, वैशालीनगर घाटाची नस्ती तयार केलेली आहे आर्केटेक्ट परमानंद रामटेके यांनी त्या कामाचे मॅप तयार केले आहे, ते काम कुठपर्यंत आले आहे.

सहा.आयुक्त :— मा.अध्यक्ष महोदय, त्याकरिता 30 लक्ष रूपयांचे टोटल इस्टीमेट बनविण्यांत आले आहे, याकरिता मी रामटेके सरांशी चर्चा केली आहे, ते काम सध्या प्रोसेमध्ये आहे.

श्री अंसारी :— मा.अध्यक्ष महोदय, पिछले 2010 मे विद्युत के काम के लिये वार्ड मे जो निधी मिला था, उस निधी की काम आज तक नही हुऐ है, इस संदर्भ मे अधिकारी वर्ग को बार बार फोन करके सूचना भी दी गयी है। मेरा वार्ड पूरा स्लम एरीया मे है अगर बारीश के पहले उस वार्ड मे काम हो जाते तो लोगो को काफी राहत मिलती, अधिकारी वर्ग ने इस ओर ध्यान देना चाहिये।

श्री बंडु राउत :— मा.अध्यक्ष महोदय, वार्ड फंडच्या संदर्भात वेगवेगळया प्रकारची चर्चा सुरू आहे, अधिकारी वर्गानी याबाबत माहिती द्यावी.

कफॉ :— मा.अध्यक्ष महोदय, वार्ड फंडची फाईल आम्ही थांबवित नाही. दोन लक्ष रूपयापर्यंतचे कोटेशन बोलावुन ते महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करावयाचे आहे.

अध्यक्ष :— मी या संदर्भात सांगु इच्छितो कि एकाच वेळी एका विकास कामाचे एकाच भागात तुकडे करता येणार नाही, त्या कामाची एक फाईल बनविली तर दुसरी फाईल त्या भागाच्या कामाची बनविता येत नाही.

श्री अंसारी :— मा.अध्यक्ष महोदय, हमारे वार्ड मे विद्युत दिवे के काम के संदर्भ मे राशी मिली मगर अभी तक काम पुरे नही हुऐ।

अध्यक्ष :— श्री मानकर तुम्ही मा.सदस्यांच्या सोबत साईट पाहुन त्वरीत कार्यवाही करावी.

डॉ.माने :— मा.अध्यक्ष महोदय, पथदिव्यांची नसती तयार करण्यांत आलेली होती, परंतु अजूनपर्यंत फिटींग आलेली नाही.

अध्यक्ष :— सी.एफ.सी. विभाग कोणत्या अधिकारीकडे येतो. पेपर संगणकाचे टेंडर निघाले होते त्याची काय स्थिती आहे.

सहा.आयुक्त :— मा.अध्यक्ष महोदय, त्या कामाचे टेंडर झाले होते, त्या प्रक्रियेत स्पर्धा न झाल्यामुळे टेंडरची तारीख वाढविण्यांत आली होती.

अध्यक्ष :— त्या टेंडरमध्ये 5 लोकांची स्पर्धा कमी होती काय ? किती लोकांची स्पर्धा टेंडर मध्ये असली पाहिजे. ते टेंडर रद्य करण्याबाबत कोणी पत्र दिले आहे काय ? एका निविदे प्रक्रियेमध्ये 5 लोक सहभागी झाले त्यानंतर सहाव्यानी निविदा प्रक्रियेमध्ये टेंडर ओपन झाल्यानंतर सहभागी होण्याकरिता पत्र दिले, त्यात टेंडर बीट ओपन झाली त्यानंतर टेंडर एक्सटेंशन करणे हे नियमात बसते काय ? याची माहिती देण्यांत यावी.

कॅफो :– मा.अध्यक्ष महोदय, याचे अधिकार मा.आयुक्तांकडे आहे, निविदेमध्ये स्पर्धा आणण्याच्या दृष्टीने निविदा रद्य करण्याचे अधिकार आयुक्तांकडे आहे. निविदेची टेंडर बीट ओपन केली असेल तर टेंडर रद्य करता येत नाही.

अध्यक्ष :– पुढच्या कामात एखाद्या व्यक्तिने पत्र दिले, आम्हाला टेंडरमध्ये सहभागी व्हायचे आहे, तेव्हा हे सुरू राहिल काय ? आपण चुकिच्या दिशेने जात आहे, या संदर्भातील नियम सर्वसामान्य व्यक्तिना जे समजते त्याप्रमाणे पांच लोकांची स्पर्धा असतांना सहाव्या व्यक्तिने पत्र दिले तर टेंडर रद्य करता येत नाही, त्यावर आपण म्हणतात कि हे आयुक्तांचे अधिकार आहे, म्हणजे आयुक्तांनी चुकिचे निर्णय घेतले आहे काय ?

श्रीमती बोहरे :– मा.अध्यक्ष महोदय, प्रतापनगर ते माटे चौकापर्यंत चोकेज साफ करण्याबाबत सांगण्यात आले होते, परंतु अजूनपर्यत ते काम पुर्ण झाले नाही.

आरोग्याधिकारी :– मा.अध्यक्ष महोदय, ते सिमेंट रोड आहे, सिमेंट रोडचे झाकण फिक्स राहते, ते सहज निघत नाही. ते झाकण आपण काढले तर तुटण्याची शक्यता निर्माण होते.

श्री बंडु राउत :– मा.अध्यक्ष महोदय, कर्मचा–यांचे मेडिकल बील किती दिवसात मिळाले पाहिजे, किती दिवसापासून कर्मचा–यांचे मेडिकल बिल पेंडींग आहे, याची माहिती देण्यांत यावी.

श्री सिद्यीकी :– मा.अध्यक्ष महोदय, दो डॉक्टर छुट्टी पर होने की वजह से मिटींग नही हो सकी नेक्स्ट वीक मे बिल निकाले जायेगें।

श्री सांदेकर :– मा.अध्यक्ष महोदय, गेल्या 15 दिवसाअगोदर माझया वार्डात 15 सफाई कर्मचा–यांना निलंबित करण्यांत आले होते. माझया वार्डात साफ–सफाईच्या कामाची कोणतीही पर्यायी व्यवस्था न करता कर्मचा–यांना निलंबित करण्यांत आले, त्यामुळे संपुर्ण परिसरामध्ये दुर्गंधी पसरलेली आहे, कोणत्या आधारावर कर्मचा–यांना निलंबित करण्यांत आले होते, याची माहिती सिद्यीकी साहेबांनी द्यावी.

उप निगम आयुक्त :– मा.अध्यक्ष महोदय, मा.आयुक्तांनी त्यांच्या चौकशी संदर्भात निर्देश दिले होते त्या आधारावर मी आपली रिपोर्ट तयार करून दिली. त्यानंतर आरोग्य अधिकारी व सहा.आयुक्तांच्या लेव्हलवर निर्णय प्रक्रिया पुर्ण करण्यांत आली.

अध्यक्ष :– ती नस्ती पुढच्या स्थायी समितीच्या सभेत ठेवण्यांत यावी.

<u>ठराव क्रमांक 41</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर